स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**तळमजला, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**

**दूरध्वनी क्र. ०२०-२६१२ २०७६**
Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in ddtpho_pune@rediffmail.com

---

**कार्यालयीन आदेश**

**विषय :** नगर रचनाकार, सहायक नगर रचनाकार श्रेणी-२ गट-ब (राजपत्रित) मधील अधिकाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत लाभ अनुज्ञेय करण्याबाबत.

**संदर्भः** १) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-१०९५ /प्र.क्र.१/ ९५/ बारा, दिनांक ८ जून १९९५.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन ११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दिनांक २० जुलै २००१.
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेतन-२००२/प्र.क्र.१/सेवा-३, दिनांक ११ जानेवारी २००२.
४) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेतन-११०९/प्र.क्र.४४/ सेवा ३, दिनांक १ एप्रिल २०१०.
५) शासन निर्णय, वित्त विभागक्र. वेतन-११०९/प्र.क्र.४१/सेवा ३, दिनांक ५ जुलै २०१०.
६) शासन, वित्त विभाग परिपत्रक क्र.आप्रयो-१०१२/प्र.क्र.७१/सेवा-३, दि.१९/०१/२०१३.
७) शासन निर्णय, वित्त विभागक्र.आप्रयो १०१४/प्र.क्र.२१/सेवा-३, दि.६ सप्टेंबर, २०१४.
८) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.मप्रन्या-२०१२/प्र.क्र.६९/२०१२ /सेवा-३, दि.७ ऑक्टोबर, २०१६.
९) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३, दि.०२ मार्च, २०१९.
१०) शासन, नगर विकास विभाग पत्र क्र.टिपीव्ही-१५१४/प्र.क्र.१०/२०१४/ नवि-२७, दि.३१/१२/२०२१.

संदर्भ (१) दिनांक ८ जून १९९५ च्या शासन निर्णयान्वये अंमलात आलेली गट-क व गट-ड (वर्ग-३ व वर्ग-४) मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने आलेली कुंठीतता घालविण्यासंबंधीची कालबद्ध पदोन्नती योजना संदर्भ (२) दिनांक २० जुलै २००१ च्या शासन निर्णयान्वये बंद करण्यात आली असून त्याऐवजी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना शासनाने लागू केली आहे. ही योजना पाचव्या वेतन आयोगानुसार रु.८०००-२७५-१३५०० व त्याहून कमी वेतनश्रेणीत

वेतन घेणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना लागू करण्यात आली आहे. संदर्भ (३) दिनांक ११ जानेवारी २००२ च्या शासन निर्णयान्वये, या योजनेचा लाभ अनुज्ञेय असलेल्या गट-अ मधील राजपत्रित तसेच गट-ब मधील राजपत्रित व अराजपत्रित अधिकारी / कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ मंजूर करण्याचे अधिकार राज्यस्तरीय विभाग प्रमुख / प्रादेशिक विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहेत.

संदर्भ क्र.(२) दि.२० जुलै २००१ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित असलेली सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना संदर्भ क्र. (५) शासन निर्णय दि.१ एप्रिल, २०१० अन्वये, सुधारित स्वरुपात यापुढे **सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना या नावाने दि.१ ऑक्टोबर, २००६ पासून अंमलात आली आहे.** ही योजना कमाल वेतन बँड पीबी-३ (रु.१५६००-३९१००) + ५४००/- ग्रेड वेतन घेणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना इतर शर्ती व अटीचे अधिन राहून सदर लाभ अनुज्ञेय केलेला आहे.

संदर्भ क्र.(४) दि.१ एप्रिल, २०१० अन्वये, कार्यान्वित असलेली सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना संदर्भ क्र. (५) शासन निर्णय दि.५ जुलै, २०१० अन्वये, शासनामधील पदोन्नतीची संधी नसलेल्या तसेच एकाकी पदांना दि.१ ऑक्टोबर, २००६ पासून लागू करण्यात आली आहे. तसेच सदरहु सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना कमाल वेतनबँड पीबी-३ (रु.१५६००-३९१००) + रु.५४०० पर्यंत ग्रेड वेतन घेणाऱ्या एकाकी पदांवरील कर्मचाऱ्यांना लागु करण्यात आली असून या योजनेखाली पात्र कर्मचाऱ्यांना त्यांच्या संपूर्ण सेवाकालावधीत कमाल दोन वेळा वेतनसंरचना मंजूर करण्याबाबत शासनाचे आदेश आहेत.

या संचालनालयातील ज्या पदविकाधारक सहायक नगर रचनाकार, श्रेणी-२ अधिकाऱ्यांना नियुक्तीच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या सेवा कालावधी नंतर संबंधित पदाच्या कर्तव्य व जबाबदारीत वाढ न होता, अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचनेचा (Non Functional Pay Structure) लाभ मंजूर करण्यात आला आहे, अशा अधिकाऱ्यांबाबत सदरहु लाभ हा पहिला लाभ समजण्यात आला असून, सदर लाभ मिळाल्यापासून सलग १२ वर्षांच्या सेवेनंतर मिळणारा लाभ हा दुसरा लाभ समजण्यात आला आहे.

वरील सर्व शासन निर्णय विचारात घेऊन तसेच दिनांक ०२ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयातील अटींच्या अधीन राहून नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागातील **नगर रचनाकार व सहायक नगर रचनाकार श्रेणी-२ गट-ब (राजपत्रित)** संवर्गातील अधिकाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा / तिसरा लाभ मंजूर करण्याबाबत संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहेत.

**सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा तिसरा लाभ.**

१) नगर रचनाकार पदावर कार्यरत खालील अधिकारी यांना तिसरा लाभ म्हणून सहायक संचालक, नगर रचना, (गट-अ) या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगानुसार रुपये १५६००-३९१०० (ग्रेड वेतन ६६००/-) मध्ये तर सातव्या वेतन आयोगानुसार वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२३, रु.६७७००-२०८७००/- मध्ये मंजूर करण्यात येत आहे.

२) दि.२ मार्च, २०१९ च्या वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार **पदविकाधारक** नगर रचनाकारांबाबत, रचना सहायक पदावरील ५ वर्षांची सेवा पूर्ण केल्यानंतर देण्यात आलेली वरिष्ठ वेतनश्रेणी (दर्जा) हा योजनेचा पहिला लाभ म्हणून धरण्याबाबत शासनाचे आदेश आहेत.

३) स्थापत्य अभियांत्रिकी **पदविकाधारक** नगर रचनाकारांबाबत, शासन निर्णय, वित्त विभाग दि.०२/०३/२०१९ नुसार तीन लाभाच्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेखाली दुसऱ्या लाभानंतर १० वर्षांनी (१७+१०) /तीन लाभांची योजना दि.०१/०१/२०१६ पासून अस्तित्त्वात आली असल्याने त्या दिनांकास तिसरा लाभ मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नाव व शैक्षणिक अर्हता | जातीचा प्रवर्ग/ जाती दावा वैध/अवैध | सु.से.आ. प्र. योजनेचा पहिला लाभ मंजूर करण्यात आल्याचा दिनांक | सु.से.आ. प्र. योजनेचा दुसरा लाभ मंजूर करण्यात आल्याचा दिनांक | सु.से.आ. प्र. योजनेचा तिसरा लाभ मंजूर करण्यात येत असलेला दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्री.अ.कृ. रायमाने, डीसीई | अ.जा. वैध | १६/०८/१९९९ | १६/०८/२०११ | १६/०८/२०२१ | ---- |
| २ | श्री.अ.रा. येलमामे, डीसीई | भ.ज.(ड) वैध | ०१/१२/१९९८ | ०१/१२/२०१० | ०१/१२/२०२० | --- |
| ३ | श्री.अ.ध. पाटील, डीसीई | खुला | ०१/१२/१९९८ | ०१/१२/२०१० | ०१/१२/२०२० | ---- |

<u>सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ.</u>

सहायक नगर रचनाकार श्रेणी-२ पदावर कार्यरत खालील अधिकारी यांना दुसरा लाभ म्हणून नगर रचनाकार, (गट-अ) या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगानुसार रुपये १५६००-३९१०० (ग्रेड वेतन ५४००/-) मध्ये तर सातव्या वेतन आयोगानुसार वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२०, रु.५६१००-१७७५००/- मध्ये मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नाव व शैक्षणिक अर्हता | जातीचा प्रवर्ग/ जाती दावा वैध/अवैध | सु.से.आ.प्र. योजनेचा पहिला लाभ मंजूर करण्यात आलेचा दिनांक | सु.से.आ.प्र. योजनेचा दुसरा लाभ मंजूर करण्यात असलेचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.रा.बि. मारकड डीसीई | भ.ज.क (वैध) | २०/०६/१९९७ | २०/०६/२००९ | दि.२०/०६/२००९ पासून दुसरा लाभ मंजूर. विभागीय चौकशी सुरु असल्याने तिसरा लाभ प्रलंबित. |

## सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा तिसरा लाभ.

सहायक नगर रचनाकार श्रेणी-२ पदावर कार्यरत खालील अधिकारी यांना तिसरा लाभ म्हणून सहायक संचालक, नगर रचना, (गट-अ) या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगानुसार रुपये १५६००-३९१०० (ग्रेड वेतन ६६००/-) मध्ये तर सातव्या वेतन आयोगानुसार वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२३, रु.६७७००-२०८७००/- मध्ये मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नाव व शैक्षणिक अर्हता | जातीचा प्रवर्ग/ जाती दावा वैध/अवैध | सु.से.आ. प्र. योजनेचा पहिला लाभ (सनर दर्जा) मंजूर करण्यात आल्याचा दिनांक | सु.से.आ. प्र. योजनेचा दुसरा लाभ मंजूर करण्यात आल्याचा दिनांक | सु.से.आ. प्र. योजनेचा तिसरा लाभ मंजूर करण्यात येत असलेला दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्री.नि.वि. जैन, डीसीआरई | खुला | ०१/०८/१९९० | ०१/८/२००५ | ०१/०१/२०१६ | ---- |
| २ | श्री.प्र.मु. मुळे, डीसीआरई | खुला | ०१/०१/१९९६ | ०१/०१/२००८ | ०१/०१/२०१८ | ५०/५५ च्या पुनर्विलोकनाच्या निर्णयाच्या अधीन राहून |

०२. वरील अधिकारी यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ खालील अटींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम क्र.११ (१) खालील पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीतील वेतन निश्चितीसाठी द्यावयाचा विकल्प अनुज्ञेय आहे. त्यांनी तसा विकल्प हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत संबंधित कार्यालयास सादर करावा. त्यानंतर आलेल्या विकल्पाचा विचार केला जाणार नाही, आणि त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम क्र. ११(१) (ए) नुसार केली जाईल.

२. वरिष्ठ वेतनश्रेणीतील वेतन निश्चितीत मिळालेला लाभ हा त्याच वेतनश्रेणीत कार्यात्मक (functional) पदोन्नती मिळाल्यानंतर पुन्हा देय होणार नाही. या योजनेअंतर्गत पदोन्नत पदाची वेतनश्रेणी मिळाली तरी उपरोक्त अधिकारी यांचे नावे (मूळ) कनिष्ठ संवर्गाच्या जेष्ठता सूचीतच राहतील.

३. उपरोक्त अधिकारी यांना भविष्यात पदोन्नती दिल्यानंतर जर त्यांनी पदोन्नती नाकारली किंवा ते नियमित पदोन्नतीस अपात्र ठरले तर, पदोन्नती नाकारल्याच्या दिनांकापासून किंवा नियमित पदोन्नतीस अपात्र ठरल्याच्या दिनांकापासून त्यांना या योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ काढून घेण्यात येईल. मात्र त्यापूर्वी देण्यात आलेल्या आर्थिक लाभाची वसुली करण्यात येणार नाही.

४. शासन निर्णय दि.१ जुलै २०११ सोबतचे **परिशिष्ट-अ** मधील मुद्दा क्र.१३ मधील स्पष्टीकरण विचारात घेता सदर अधिकारी / कर्मचाऱ्यांची जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त असल्याने त्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा आर्थिक लाभ मंजूर करण्यात येत आहे.

५. या आदेशान्वये मंजूर करण्यात येत असलेल्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभाची नोंद संबंधित अधिकारी यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

**(मूळ मसुदा मा.संचालकांनी मंजूर केला आहे)**

जा.क्र.आस्था/सुसेआप्रयो/नर-सनर/गट-अ/ब/प्रशा-१/ ४४१०
मध्यवर्ती कार्यालये, पुणे – ४११ ००१
दिनांक - ३०/०८/२०२२

( वि.ल.वाघमोडे )
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता.

प्रत : मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, नवि-२७/नवि-३, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

प्रत : मा.नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सादर.

प्रत : मा.महालेखापाल, मुंबई-१ / नागपूर-२.

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :

१) सहसंचालक, नगर रचना, औरंगाबाद / नाशिक / कोकण विभाग.
//- सु.से.आ.प्र.योजनेचा लाभ मंजूर करण्यात आलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना आदेशाची प्रत विभागीय कार्यालयाच्या स्तरावरुन देण्यात यावी.
२) मुद्रांक जिल्हाधिकारी,अंमलबजावणी-२,प्रधान मुद्रांक कार्यालय,मुंबई.
३) आयुक्त, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका/ उल्हासनगर मनपा.
४) सहायक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा.
५) नगर रचनाकार,वर्ग-१, मूल्यांकन तज्ञ, नाशिक, विभागीय कार्यालय, नाशिक.
६) कोषागार अधिकारी, -------------------
७) कार्यासन अधिकारी, मुख्य कार्यालय, टिपीव्ही-१ / २ / ३ / ४ / ५ / ६ /७, प्रशा-१/ प्रशा-१अ /प्रशा-१ ब/ प्रशा-२/ लेखा / अर्थसंकल्प / रेखाकला
८) श्री.पालकर, स्वी.स./श्रीमती हुपरे, उ.श्रे.ल.ले.
९) संशोधन अधिकारी, ना.सं.घ./ रा.ना.मा.प.कक्ष
//- प्रस्तुत आदेश संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावेत.
वैयक्तिक धारिका
१०) श्री.जाधवर, व.लि. प्रस्तुत आदेशामध्ये देण्यात आलेल्या सु.से.आ.प्र.योजनेच्या लाभाची नोंद ज्येष्ठता सूचीमध्ये घेण्यात यावी.

**प्रत विहित मार्गाने रवाना.**

१) श्री.अ.कृ.रायमाने, नगर रचनाकार, सहायक संचालक,नगर रचना, ठाणे शाखा.
२) श्री.अ.रा.येलमामे, नगर रचनाकार, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका.

३) श्री.अ.ध.पाटील,नगर रचनाकार,मूल्यांकन तज्ञ,नाशिक-अहमदनगर,विभागीय आयुक्त कार्यालय,नाशिक.

४) श्री.रा.बि.मारकड,सहायक नगर रचनाकार, प्रधान मुद्रांक कार्यालय,मुंबई कार्यालय.

५) श्री.प्र.मु.मुळे, स.न.र., उल्हासनगर महानगरपालिका.

६) श्री.नि.वि.जैन, स.न.र. (से.नि.), सहायक संचालक,नगर रचना, बीड शाखा.